## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२६३/२०१७ मधील
## निशाणी क्र.३३ वर आदेश

**CNRNO.MHLA110010922018.**

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज प्रतिवादीने प्रतिदावा दाखल करुन घेण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास मुळ वादीने म्हणणे दाखल करुन प्रतिवादीने दि.०४/०६/२०१८ रोजी कैफियत दाखल केल्याचे, नि.क्र.२४ ला मुद्दे काढण्यात आल्याचे व प्रकरणात वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चे सरतपास दाखल केल्याचे कथन केलेले आहे. तसेच सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६ ब खालील तरतुदीनुसार चालु शकत नसल्याचे कथन करुन अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील कागदपत्रावरुन व दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांच्या युक्तीवादावरुन याठिकाणी नमुद करणे आावश्यक वाटते की, सदरचा दावा वादीने मिळकतीचा कब्जा मिळण्याकरिता दाखल केलेला असुन प्रतिवादीने नि.क्र.२२ ला दि.०९/०१/२०१८ रोजी कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी फेटाळली आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.२४ ला मुद्दे काढण्यात आलेले असुन नि.क्र.२८ ला वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरिता म्हणजेच वादीतर्फे साक्षीदार क्र.१ च्या उलटतपासाकरिता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दाखल केलेला आहे.

४. सदर प्रकरणातील प्रतिवादीने दाखल केलेल्या कैफियतीमधील कथनावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सन १९८९ मधील कथीत करारपत्राबाबत प्रतिवादीने कैफियतीमध्ये कथन केलेले आहे. तसेच प्रतिवादीने कैफियतीमधील परिच्छेद क्र.१३ मध्ये कथीत करारपत्राबाबत दावा अथवा प्रतिदावा दाखल करणार असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे सदर कथनावरुन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६ ब खालील तरतुदीची बाधा येत नाही. तसेच सदर प्रतिवादी हा कथीत सन १९८९ मधील करारपत्राच्या आधारे प्रस्तावित प्रतिदावा दाखल करीत असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व प्रस्तावीत प्रतिदाव्याचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रकरणाची संख्या टाळण्याकरिता प्रतिवादीला प्रतिदावा दाखल करण्यास परवानगी दिल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादीला प्रतिदावा दाखल करण्यास परवानगी दिल्यामुळे प्रकरणाची संख्या टाळता येणार असुन गुंतागुंत देखील टाळता येणार आहे. तसेच प्रतिवादीला प्रतिदावा दाखल करण्यास परवानगी दिल्यानंतर वादीला प्रतिदाव्याबाबत बचाव मांडण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, अर्ज मंजूर करणे

न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि.क्र.३३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, निलंगा यांनी नि.क्र.३० सोबत दाखल प्रतिदाव्याची नियमाप्रमाणे तपासणी करुन न्यायालयीन मुद्रांक शुल्काची संबंधीत नोंदवही मध्ये नोंद घ्यावी.

स्वा/-

दि. ०६.०६.२०१९.

(शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 06.06.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 06.06.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.06.2019 |